**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. रमेश राजाराम तुंगारे,
राघवेंद्र नगर, खराडी,
स.क्र.३५, प्लॉट नं.८८, चंदननगर,
पुणे- ४११ ०१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश राजाराम तुंगारे, राघवेंद्र नगर, खराडी, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे
श्री. चिंतामणी जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१२.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.२.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

पुणे दख्खन पाटबंधारे मंडळ (मध्य) सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित ) एरंडवणा, पुणे शासकीय आदेशांतील अटी/शर्तीचे उल्लंघन करुन जागा वाटपातील गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी दिल्या गेलेल्या आदेशांच्या प्रती, संस्थेला दिलेल्या नोटिसा व त्याची उत्तरे, सहा सभासदांची प्रतिज्ञापत्रे इत्यादी

## विवेचन

दख्खन पाटबंधारे मंडळ (मध्य.) सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित ) एरंडवणा, पुणे या संस्थेतील गैरव्यवहारासंदर्भातील चौकशी करण्यासाठी दिल्या गेलेल्या आदेशांच्या प्रती व त्याअनुषंगाने एकूण सहा मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रमेश राजाराम तुंगारे यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. या संस्थेला केलेले जागा वाटप, १. डॉ. श्रीमती पुष्पा गायकवाड २. श्री. ए. के. इनामदार ३. श्री. जी. डी. क्षीरसागर ४. श्री. एम. पी. गारे ५. श्री. सी. पी. कुठाळे ६. श्री. आर. व्ही. मुंगळे या सभासदांनी सभासदत्वासाठी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या व त्यांना मान्यता दिलेल्या सरकारी आदेशाच्या प्रती, तहसीलदार; हवेली यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल व त्या अहवालावर करण्यात आलेली कार्यवाही अशा स्वरुपाची माहिती श्री. तुंगारे यांनी प्रामुख्याने मागितली होती. परंतु विहित मुदतीपेक्षा विलंबाने व अपूर्ण माहिती देण्यात आली, या कारणावरुन श्री. तुंगारे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री. सुहास दिवसे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती योग्य ठरवून अपील निकाली काढले. 'सहाय्यक चिटणीस यांनी अपीलकर्ता यांना या विषयासंबंधी सर्व संचिका दाखवून योग्य ती माहिती

तात्काळ उपलब्ध करुन द्यावी,' असे त्यांनी निर्णयपत्रात नमूद केले आहे. विहित मुदतीत व पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. तुंगारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. एस.आर. साळुंके नामक व्यक्तीला पाटबंधारे खात्याने १,६८,३४७/- चौ. फूट जागा दिली. त्यातील काही जमीन जिल्हाधिकारी किंवा महसूल खाते यांची परवानगी न घेता पाटबंधारे खात्याने परस्पर दिली, त्यात सभासद घेताना व भूखंड वाटपात गैरव्यवहार झाला. या संदर्भात आणखी तक्रारी व चौकशा झाल्या असूनही उच्च पदस्थांच्या संबंधामुळे ही माहिती उघड केली जात नाही व गैरव्यवहार दडपले जात आहेत, असा श्री. तुंगारे यांचा आक्षेप आहे. त्याअनुषंगाने विविध अर्जांद्वारे ते हा प्रश्न मांडत आहेत. दि. १२.५.१९८३ व दि. १६.१२.१९८६ च्या शासकीय आदेशातील अटी व शर्तीचे उल्लंघन करुन संस्थेतील जागा वाटपात गैरव्यवहार झाला आहे, असे श्री. तुंगारे यांचे म्हणणे आहे. १९९१ साली तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. श्रीनिवास पाटील यांनी या सर्व प्रकरणांची गुन्हा अन्वेषण विभागाकडून चौकशी करण्याच्या शिफारशीला दि. ९.५.१९९१ रोजी मान्यता दिल्याचे कागदपत्रही श्री. तुंगारे यांनी आयोगापुढील सुनावणीत सादर केले. 'डॉ. श्रीमती पुष्पा गायकवाड या निवृत्त आय.ए.एस. अधिकारी श्री. व्ही. पी. राणे यांच्या मेहुणी असून त्यांच्यासह काही सभासदांबाबत मागितलेली प्रतिज्ञापत्रे, त्यांच्या व्यक्तिगत माहितीचा तक्ता (त्यात खऱ्या उत्पन्नाची माहिती ) आदि माहिती उपलब्ध नसल्याचे सांगून देण्यात आली नाही. शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याबाबत संस्थेला दिलेल्या नोटिसा व 'प्रतापगड' आणि 'सप्तरंग' या उपरोक्त भूखंडावरील संस्था यांच्याकडून आलेले खुलासे याबाबतच्या कार्यवाहीच्या माहितीच्या संदर्भात सदर संस्थेकडून प्राप्त झालेल्या खुलाशावर कार्यवाही चालू आहे,' एवढेच उत्तर दिले आहे. तसेच शासकीय कर्मचारी सभासद असलेल्या या गृह निर्माण संस्थांमध्ये वेगळ्या उत्पन्न गटातील (मोठ्या ) सदनिका मिळण्यासाठी काही सभासदांनी खोटी प्रतिज्ञापत्रे दिली आहेत. जिल्हा परिषदेच्या वा शासकीय सेवेत तीन वर्षे पूर्ण केली नसतानाही त्यांच्या सभासदत्वाला जिल्हाधिकारी कार्यालयाने ज्या आदेशांच्या / नियमांच्या आधारे मान्यता दिली त्याच्या प्रतीही मिळाल्या नाहीत,' असे श्री. तुंगारे यांनी नमूद केले.

हा सर्व विषय १९८६-८७ ते १९९१ या काळातील असून काही कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे कसून शोध घेतल्यानंतरही आढळून येते, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री. चिंतामणी जोशी यांनी सांगितले. उपलब्ध असलेली सर्व माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह श्री. तुंगारे यांना देण्यात आली आहे तसेच संबंधित संचिकाही पाहणीसाठी त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. दादाभाऊ जोशी यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

सुमारे १५ वर्षांपूर्वीची कागदपत्रे शासकीय अभिलेखात उपलब्ध होऊ नयेत हे संशयाला वाव देणारे आहे, असे श्री. तुंगारे यांचे प्रतिपादन आहे. एकूण कागदपत्रे व उपलब्ध माहिती पाहता त्यांच्या विधानाला पुष्टी मिळते. या विषयासंदर्भात संबंधित सर्व माहिती अपीलकर्त्याला मिळणे आवश्यक आहे. या सर्व विषयाच्या संदर्भात श्री. तुंगारे यांनी केलेल्या आरोपांची शहानिशा करणे अथवा त्यांच्या मागणीनुसार चौकशी करण्याबाबत उपाययोजना करणे हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र सरकारी भूखंडावर उभ्या राहिलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत नियमांचे पालन झाले आहे की नाही, सभासदत्व व सदनिका वाटप नियमानुसार झाले आहे की नाही, तसेच चौकशी झाल्यानंतर काय कार्यवाही केली गेली, ही सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध झाली पाहिजे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेमध्ये हे अंतर्भूत आहे.

उभय बाजूंची निवेदने व आयोगाला सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. उपलब्ध माहिती देण्यात आली असली तरी अपीलकर्त्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही. मात्र ती न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांचा उद्देश दिसून येत नाही. परंतु सर्व कागदपत्रांचा शोध घेऊन उर्वरित माहिती दि. ३०.१०.२००७ पर्यंत अपीलकर्त्याला द्यावी.

३. सर्व संबंधित संचिका अपीलकर्त्याला पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊन त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात.

४. अपीलकर्त्याने मागितलेली व अभिलेखात असणे आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास त्याच्या जतनाची जबाबदारी असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द पोलिसांकडे फौजदारी गुन्हा नोंदवावा. त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगाला सादर करावा.

५. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार विहित मुदतीत उत्तर दिले गेले आहे. त्यामुळे शास्ती नाही.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २०.९.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. बाजीराव नामदेव शिंदे
गणेशखिंड, पुणे-४११ ००७ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, — उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पिंपरी
श्री. अ.मा. थोरात

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पिंपरी
श्री. उदय वि. कोंडावार

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाजीराव ना.शिंदे, गणेशखिंड, पुणे-४११ ००७

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पिंपरी श्री. अ.मा. थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पिंपरी, श्री. उदय वि. कोंडावार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे ताथवडे व हिंजवडी येथे दि. १.९.२००५ ते दि. ३०.५.२००५ या कालावधीत घेण्यात आलेल्या लँड सर्व्हे रिपोर्ट च्या नोंदी (एल.एस.आर. - भार निरीक्षण अहवाल )

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाजीराव नामदेव शिंदे यांनी मौजे ताथवडे व हिंजवडी येथे दि. १.९.२००५ ते दि. ३०.५.२००५ या कालावधीत घेण्यात आलेल्या लँड सर्व्हे रिपोर्ट (एल.एस.आर. - भार निरीक्षण अहवाल )नोंदीची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतीत ही माहिती दिली. परंतु श्री. शिंदे यांनी ' मिळालेली माहिती सदोष व अपूर्ण 'असल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, पिंपरी यांच्याकडे अपील केले. मूळ अर्जात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्णपणे दिलेली आहे व अपिलामध्ये अधीक माहिती मागितली आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. शिंदे यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतीत दिली आहे. प्रथम अपिलात श्री. शिंदे यांनी आणखी तपशील समाविष्ट करुन माहिती मागितली. श्री. शिंदे यांनी 'मौजे ताथवडे व हिंजवडी येथील दि. १.९.२००५ ते ३०.९.२००५ या कालावधीत घेण्यात आलेल्या एल एस आरच्या नोंदीची माहिती 'एवढेच मुळ अर्जात नमूद केले आहे. प्रथम अपिलात त्यांनी 'ताथवडे व हिंजवडी येथील कनिष्ठ अभियंता यांनी दि. १.९.२००५ ते दि. ३०.९.२००५ आज रोजीच्या (लोडाच्या नोंदी ट्रान्सफॉर्मरवर व डीपी सह ) नोंदीची माहिती 'असा अधीक तपशील मागितला. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात मागता येणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय रास्त आहे. मात्र हा तपशील मिळाल्याशिवाय माहितीला परिपूर्णता येणार नाही ,असे प्रतिपादन श्री. शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री. उदय कोंडावार व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. अ.मा. थोरात यांनी मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली असल्याचा पुनरुच्चार केला, परंतु अपिलात मागितलेला तपशील देण्यात अडचण नसल्याचे नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. माहितीच्या परिपूर्णतेच्या दृष्टीने देणे शक्य असलेला पूरक तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास तीन दिवसाच्या आत द्यावा, असा आदेश सुनावणीच्या वेळीच आयोगाने दिला होता, त्याचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १९.९.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.बाजीराव नामदेव शिंदे,
गणेशखिंड, पुणे-४११ ००७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, — उत्तरवादी
गणेशखिंड (शहर) मंडल, पुणे
श्री. अ.ना. गुजर

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पुणे
श्री. अ.मा. थोरात

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाजीराव ना.शिंदे, गणेशखिंड, पुणे-४११ ००७

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
गणेशखिंड (शहर) मंडल, पुणे श्री. अ.ना. गुजर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पिंपरी विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.३.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.४.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.८.२००५ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. १४.४.२००४ रोजी आलेली तक्रार व त्यावर मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ, पुणे विभाग यांनी दि.२८.४.२००४ चे पत्र क्रमांक CE/PZ/T/१४७ कार्यवाईसंबंधी केलेल्या आदेशांची काय कार्यवाही झाली याची लेखी माहिती

## <u>विवेचन</u>

दि. १४.४.२००४ रोजी आलेली तक्रार व त्यावर मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे विभाग यांचे पत्र क्र. सीई/पी.झेड/टी/ १४७ दि. २८.४.२००४ यावर काय कार्यवाही झाली याची माहिती अपीलकर्ता श्री. बाजीराव नामदेव शिंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, पुणे यांच्याकडे दि. ३१.३.२००५ च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी या अर्जाचे उत्तरच दिले नाही, असे नमूद करुन श्री. शिंदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गणेशखिंड (शहर) मंडल,पुणे यांच्याकडे

अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित, गणेशखिंड, शहर मंडल, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे यांनी सुनावणी घेतली व संबंधित माहिती तात्काळ देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना तोंडी व पत्राद्वारे दिला. परंतु तरीही माहिती मिळाली नाही म्हणून मुख्य अभियंता, गणेशखिंड (शहर) मंडल पुणे यांनी त्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांना दि. २०.९.२००५ रोजी कार्यवाहीची जाणीव करुन देणारे व माहिती त्वरीत देणारे पत्र लिहिले. त्यानंतर अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित गणेशखिंड, शहर मंडल, पुणे यांनी श्री. शिंदे यांना चर्चेसाठी बोलाविले. अधीक्षक अभियंता यांनी जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना संबंधित पत्राची प्रत सत्वर उपलब्ध करुन देण्यास दि. १६.११.२००५ रोजी कळविले. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ३.१२.२००५ रोजी पत्र पाठविले व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, यांच्या कार्यालयातील उपलब्ध रेकॉर्ड शोधले असता व वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधला असता वरील पत्र अद्याप प्राप्त होऊ शकले नाही, संबंधित कागदपत्र उपलब्ध झाल्यानंतर त्वरित माहिती देण्यात येईल असे श्री. शिंदे यांना कळविले. दि. २६.१२.२००५ रोजी अधीक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांना माहिती देण्याविषयी व कार्यवाहीची जाणीव करुन देणारे पत्र पाठविले. वीज चोरी सारखी गंभीर बाब असतानाही माहिती देण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, मूळ पत्र कार्यालयात सापडत नसल्याचे सांगून माहिती देणे टाळण्यात येत आहे, असे पत्र श्री. शिंदे यांनी अधीक्षक अभियंता श्री. अशोक गुजर यांना दि. ३१.१.२००६ रोजी पाठविले. मूळ संदर्भित पत्र कार्यालयीन दस्तऐवजात सापडू शकले नाही, त्यामुळे त्या पत्राच्या अनुषंगाने काय कारवाई झाली ते कळू शकले नाही. सदर पत्र शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करुन सुध्दा ते उपलब्ध न झाल्यामुळे मागितलेली माहिती देण्यास हे कार्यालय असमर्थ आहे असे अधीक्षक अभियंता यांनी दि. १६.२.२००६ रोजी श्री. शिंदे यांना कळविले. श्री. शिंदे यांना दि. २५.२.२००६ रोजी हे पत्र मिळाले. माहितीच्या मागणीची दखल न घेता टाळाटाळ केल्याच्या कारणावरुन श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभागाकडे मागणी केली, त्यावेळी गणेशखिंड मंडल अस्तित्त्वात नव्हते, त्यामुळे अर्जात नमूद केलेले दि. २८.४.२००४ चे क्र. १४७ हे पत्र मिळाले नाही. नंतरच्या कालावधीत जवळ जवळ तीन तीन कार्यकारी अभियंता व मुख्य अभियंता बदलले गेले, त्यामुळे हा विषय योग्य पध्दतीने हाताळला गेला नाही असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री. गुजर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. अधिकारी बदलले तरी मूळ पत्र गहाळ होणे हे संशयाला वाव देणारे व भ्रष्टाचाराला पाठीशी घालणारे आहे असे प्रतिपादन श्री. शिंदे यांनी केले. मूळ पत्र न मिळाल्यामुळे कार्यवाहीबाबतची माहिती देणे शक्य झाले नाही, ती टाळण्याचा हेतू नव्हता, अन्‍ अर्जांच्या संदर्भात आम्ही त्वरीत प्रतिसाद देत आलो आहोत व वीज चोरीची प्रकरणे गांभीर्याने हाताळत आलो आहोत असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी उदाहरणासह सांगितले.

प्रशासकीय क्षेत्र बदलणे अथवा अधिकाऱ्यांची बदली होणे हे माहिती न देण्याचे वा अर्जदाराला उत्तर न देण्याचे समर्थनीय कारण ठरु शकत नाही. संबंधित पत्राचा शोध घेऊन माहिती दिली गेली पाहिजे.

उभय बाजूंच्या निवेदनांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याने नमूद केलेल्या पत्राचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्वरित विहित कार्यवाही करावी असा आदेश सुनावणीच्या वेळीच आयोगाने दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि. ३०.९.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३.     संबंधित माहिती न देण्यास जबाबदार असणारे तत्कालीन अधिकारी व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यांच्या बाबतची नाव, तत्कालीन पद, सध्याचे पद व कामाचे ठिकाण अशी तपशीलवार माहिती त्यांनी मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या खुलाशासह विद्यमान अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.९.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावी. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांच्यावर शास्ती का लावू नये याबाबतचे त्यांचे निवेदन त्यात समाविष्ट असावे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**पुणे**
**दि. १९.९.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. आदित्य चंद्रकांत राऊत,
३०, गुरुवार पेठ, शिताळदेवी चौकाजवळ, — अपीलकर्ता
पुणे - ४११ ०४२

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलिस उप आयुक्त, मुख्यालय, — उत्तरवादी
पोलिस आयुक्तालय, पुणे शहर

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलिस आयुक्त,
डेक्कन विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. आदित्य चंद्रकांत राऊत, ३०, गुरुवार पेठ, शिताळदेवी चौकाजवळ, पुणे- ४११ ०४२

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे सौ. भारती कुराडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची | दि. २७.१०.२००५ / १६.१२.२००५ |

| | | |
|---|---|---|
| | तारीख | |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१२.२००५/ २५.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** डेक्कन विभाग, पुणे येथील चॅप्टर केस क्र. १४६/२००५, सरकार वि. जाब देणार श्री. आलोक वि.देवताळे या केसमधील कागदपत्रांच्या प्रमाणित नकला | |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. आदित्य चंद्रकांत राऊत यांनी दि. २७.१०.२००५ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे यांच्याकडे चॅप्टर केस क्र. १४६/२००५ या केसच्या संदर्भातील कागदपत्रे मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांना हा अर्ज दि. ३१.१०.२००५ रोजी मिळाला. ' चॅप्टर केस क्र. १४६/२००५ च्या संदर्भातील आजपर्यंतची माहिती ,तसेच आवश्यक असेल त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकला देण्यात याव्यात ', असे या अर्जात म्हटले आहे. माहितीच्या नेमकेपणाबद्दल संदिग्धता असल्यामुळे त्यांना नेमकी कोणती कागदपत्रे हवीत याचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले, त्यांनी तसा अर्ज दिल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु आपल्याला योग्य व विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. राऊत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, मुख्यालय, पोलिस आयुक्तालय, पुणे शहर यांच्याकडे अपील केले. आवश्यक ती माहिती देण्यात आली असल्याचे नमूद करुन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.एम. एस. सोळुंके यानी हे अपील फेटाळून लावले. त्याविरुध्द श्री. राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शास्ती, शिस्तभंग आदि कारवाईची मागणी केली आहे.

ॲड. आदित्य चंद्रकांत राऊत व श्री. अलोक विलास देवताळे नामक व्यक्ती यांच्या परस्परविरोधी तक्रारीच्या संबंधीचा हा विषय आहे. आपण या चॅप्टर केसमधील फिर्यादी मूळ तक्रारदार असल्याचे श्री. राऊत यांनी अर्जात म्हटले आहे, तर ते सरकारी साक्षीदार असल्याचे जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे सौ. भारती कुराडे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. या चॅप्टर केसच्या सुनावणीच्या वेळी त्यांना हव्या असलेल्या नेमक्या कागदपत्रांबाबत विचारणा करण्यात आली, परंतु त्यांनी काहीही सांगितले नाही, त्यामुळे दि. २१.११.२००५ व दि.१३.१२.२००५ रोजी त्यांना तशा स्वरुपाची विचारणा करणारे पत्र देण्यात आल्याचे सौ. भारती कुराडे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. आपल्याला अशी कोणतीही विचारणा करण्यात आली नाही, अशी पत्रेही आपल्याला देण्यात आलेली नाहीत, असे प्रतिपादन ॲड. राऊत यांनी केले. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. सी. शेपाळ यांच्या स्वाक्षरीने पाठविलेल्या अशा पत्रांच्या प्रती सौ. भारती कुराडे यांनी सादर केल्या, तसेच ती पत्रे पाठविल्याची नोंद असलेली जावक नोंदवहीतील पृष्ठाची प्रतही सादर केली. दि. १३.१२.२००५ च्या पत्रात श्री शेपाळ यांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्र.ममाअ - २००४/प्र.क्र.१३५/०४/०५ (दि.१६.१०.२००४) चा उल्लेख करुन त्यानुसार चॅप्टर केसमधील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रे देण्यात येतील असे नमूद केले आहे. ॲड. राऊत यांनी त्यांला आक्षेप घेतला आहे.

ॲड. राऊत यांनी अपेक्षित माहितीचा नेमका स्पष्ट करणारा अर्ज दि. १६.१२.२००५ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना सादर केला. त्यानंतर श्री. डी. सी. शेपाळ, सहाय्यक पोलिस आयुक्त, डेक्कन विभाग यांच्या दि. ४.१.२००६ च्या पत्रान्वये सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, कल्याण व मुख्यालय, पुणे यांनी दि. २५.१.२००६ रोजी ॲड. राऊत यांना माहिती दिली. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार दि. १.२.२००६ रोजी मूळ कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले. आपल्या मूळ अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी ४३ दिवसांनंतर उत्तर दिले, त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम २० अन्वये शास्ती लावावी. दि. १६.१२.२००५ रोजी आपण केलेला अर्ज हा मूळ अर्जापेक्षा स्वतंत्र अर्ज होता त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्तीत सूट देऊ नये अशी मागणी ॲड. राऊत यांनी केली. परंतु माहितीबाबत स्पष्ट तपशील नोंदविणारा अर्ज दि. १६.१२.२००५ रोजी सादर झालेला असल्यामुळे माहिती देण्याला विलंब झालेला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे सौ. भारती कुराडे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पहाता ॲड. राऊत यांच्या दि. २७.१०.२००५ रोजीच्या प्रथम अर्जात अपेक्षित माहितीबाबत स्पष्टता नव्हती, तसेच नेमकेपणे माहिती

मागणारा अर्ज त्यांनी दि. १६.१२.२००५ रोजी केला, असे दिसून येते. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे. ॲड.राऊत यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाच्या उल्लेखाला घेतलेला आक्षेप माहिती नाकारली जाऊ नये एवढयापुरताच लागू आहे. मात्र तांत्रिक बंधने पाळली असली तरी माहिती मागणाऱ्या अर्जाची तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली एकूण हाताळणी पाहता माहिती देण्यात चालढकल करण्याचा भाग दिसून येतो. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. सी. शेपाळ यांना याबाबत समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. माहिती देण्याबाबत पोलिस विभागाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अधिक तत्परता बाळगून विहित मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे, याची समज पोलिस विभागाला देण्यात येत आहे. पोलिस आयुक्त, पुणे यांनी सर्व संबंधितांना याबाबत अवगत करावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २०.९.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

ॲड. गोरक्ष गंगाधर बोरकर,
दिप हाईट्स सह. गृह.रचना संस्था मर्या. — अपीलकर्ता
फ्लॅट नं.१८, दुसरा मजला, कॅनरा बँकेच्यावर,
रामवाडी, पुणे-नगर रोड, पुणे-४११ ०१४

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अतिरिक्त महापालिका आयुक्त ( विशेष ) — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
उप आयुक्त ( जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. गोरक्ष गंगाधर बोरकर, दिप हाईट्स सह. गृह.रचना संस्था मर्या.
फ्लॅट नं.१८, दुसरा मजला, कॅनरा बँकेच्यावर, रामवाडी,
पुणे-नगर रोड, पुणे-४११ ०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त ( विशेष )
पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती. एम.एन. केरकेट्टा

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त, ( जनरल)
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. डी.ए. ठुबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

मौजे लोहगाव येथील स.क्र.२१५/१अ/१/२, स.क्र. २१५/१अ/१/३, स.क्र.२१५/१अ/१/४ वैशाखी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित व स.क्र. २१५/१ अ/१/१ वैशाली सहकारी गृह रचना संस्था मार्यादित या संस्थेने येरवडा क्षेत्रिय कार्यालयात कर आकारण्यासाठी दिलेल्या अर्जाची प्रत, उपनिबंधक; सहकारी संस्था यांनी संस्थेची नोंदणी केली त्या प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या सभासदांची यादी व त्यांचे नावावरील मिळकतीचा तपशील, मिळकत कर भरला असल्यास व थकबाकी असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे

## विवेचन

पुणे महानगरपालिका हद्दीतील मौजे लोहगाव येथील स.क्र.२१५/१अ/१/२, स.क्र.२१५/१अ/१/३, वैशाखी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित व स.क्र.२१५/१अ/१/१, वैशाली सहकारी गृहरचना संस्था मर्या. या सोसायटीच्या सभासदांची यादी व तपशील, मिळकत करआकारणी,

नोंदणी क्रमांक, नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत अशी माहिती ॲड. गोरक्ष गंगाधर बोरकर यांनी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (जनरल) पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. माहिती मुदतीत न मिळाल्यामुळे ॲड. बोरकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. अपिलातील निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून ॲड. बोरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

उपरोक्त वैशाखी व वैशाली या सहकारी गृहरचना संस्थांची पुणे महानगरपालिकेच्या मिळकत करआकारणी कार्यालयात नोंद आहे. या संस्थेचे नोंदणीपत्र उपनिबंधक; सहकारी संस्था यांनी केले, नोंदणीचे प्रमाणपत्र, नोंदणीचा क्रमांक व सभासदांची यादी, सभासदांच्या नावावर असणारा वार्षिक मिळकतकर, त्यापैकी किती कर भरला व किती थकबाकी आहे, थकबाकी वसुलीसाठी पुणे महानगरपालिकेने वॉरंट बजावले असल्यास त्याच्या नकला अशी माहिती ॲड. बोरकर यांना हवी होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (जनरल), श्री. शिरीष यादव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उत्तर देण्यासाठी असलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत ॲड. बोरकर यांना काहीही कळविले नाही. दि. ७.४.२००६ च्या अर्जाला त्यांनी दि. २९.५.२००६ रोजी म्हणजे २० दिवस विलंबाने उत्तर पाठविले. वैशाखी सहकारी गृहरचना संस्थेत १६ भूखंडाची नोंद असून ते सर्व 'चेअरमन, वैशाखी सहकारी गृहरचना संस्था मर्या.' याच नावावर आहेत व मिळकतकराची आकारणी दि. १.४.१९९० पासून करण्यात आली आहे, असे सहाय्यक करआकारणी व करसंकलन कार्यालयाने या उत्तरात नमूद केले आहे. 'करआकारणीबाबत मूळ कागदपत्रांचा शोध घेतला असता आढळ होत नाही,' असे त्यात म्हटले आहे व एकूण २०,०००/- ते २६०००/- रुपयांपर्यंत थकबाकी असून या थकबाकीची वॉरंट्स येरवडा विभागीय कार्यालयाकडून उपलब्ध होतील, असे त्यात नमूद केले आहे. वैशाली सहकारी गृहरचना संस्थेबाबत कोणताही उल्लेख जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरात केलेला नाही.

सभासदांनी कर भरल्याबाबतची व अन्य तपशिलातील माहिती दिली नसल्याचे नमूद करुन ॲड. बोरकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. 'सदर संस्थांचे सभासदांची नावे करआकारणी रजिस्टरला नसल्याने सदर संस्थांची लाखो रुपये थकबाकी असताना वसूल केली नाही. सदर संस्थांचे सभासद हे महाराष्ट्र शासनातील

उच्चपदस्थ अधिकारी असल्याने वरील जमीन खरेदी करुन सदरच्या संस्था स्थापन करुन महानगरपालिकेचा कर भरीत नाहीत, तरीही त्यांचेवर महापालिकेने कुठलीही कारवाई केली नाही. सामान्य नागरिक व अधिकारी यांचे करआकारणीबाबत महापालिका कायद्यात वेगळी तरतूद आहे का ? त्याची माहिती मिळणे जरुरीचे असताना, तसेच सदर अधिकारी यांनी वरील संस्थेत स्वतःचे मालकीची जागा असताना महाराष्ट्रात इतर ठिकाणी सरकारी भूखंड सवलतीचे दरात मिळणेसाठी प्रतिज्ञापत्र केले आहे का ? त्याची माहिती मिळणे जरुरीचे आहे,' असे ॲड. बोरकर यांनी अपिलाच्या सुनावणीत नमूद केले आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. अरुण पाटील यांनी हे अपील अंशतः मान्य केले. 'सदर करआकारणीची केस सुमारे १० ते १५ वर्षांपूर्वीची असल्याचे आढळून आल्याने अपिलार्थी यांना विहित मुदतीत उत्तर देणेस विलंब झालेला आहे. सदर मिळकतीवरील मिळकतराचे वसुलीसाठी प्रतिवर्षी मिळकतकराचे बिल पाठविणे, मिळकतकर मुदतीत न भरल्यास नोटिस पाठविणे, वॉरंट पाठविणे इत्यादी कारवाई करण्यात येते,' असे प्रतिपादन करआकारणी व करसंकलन कार्यालयातील विभागीय निरीक्षक श्री. अमर परदेशी यांनी सुनावणीत केल्याचे त्यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे. तसेच 'प्रस्तुत मिळकतीची करआकारणी नवीन खरेदीदार वैशाखी सहकारी गृहरचना संस्था या नावाने केली आहे. तथापि सदर करआकारणीबाबतच्या केसचा आढळ खात्याकडे होत नसल्याने अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. मात्र, सदर सोसायटीमधील १६ प्लॉट्सची आकारणी स्वतंत्ररीत्या करण्यात आली असून सर्व १६ प्लॉट्स सोसायटीच्या नावे दर्शविण्यात आले आहेत. या सर्व प्लॉट्सची आकारणी स्वतंत्ररीत्या झाली असल्यामुळे प्रत्येक प्लॉट्सच्या मिळकतकर थकबाकीचा तपशील देणे शक्य आहे. खात्याने दुय्यम निबंधक, सहकारी संस्था यांचेकडून त्यांचेकडे दाखल झालेल्या प्लॉट्सधारकांची यादी प्राप्त करुन घ्यावी व त्याप्रमाणे आकारणी रजिस्टरमध्ये प्लॉट्सधारकांची नांवे नियमाप्रमाणे नोंदविण्यात यावीत. या सर्व प्लॉटधारकांकडून थकबाकीची रक्कम वसूल करावी व त्याप्रमाणे जी कार्यवाही केली असेल त्याबाबतची माहिती अपिलार्थी यांना कळविण्यात यावी. सदरची पूर्तता खात्याने एक महिन्यात करावी. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस अवधी लागणार असल्यास अपिलार्थी यांना जी काही कार्यवाही केली असेल ती कळवावी व उर्वरित कार्यवाही पूर्ण करण्यास लागणारा वेळ अपिलार्थी यांना कळवून त्या मुदतीत

त्यांना पूर्ण माहिती देण्याची दक्षता घ्यावी,' असेही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे. परंतु या नंतरही भूखंडधारकांची नावे, संस्थेच्या नोंदणीची प्रमाणपत्रे, इत्यादी तपशील मिळाला नाही, थकबाकी वसुलीसाठी केलेल्या कार्यवाहीबाबत काहीही कळविले गेले नाही, असे ॲड. बोरकर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

'सभासदांची नावे करआकारणी रजिस्टरला नसल्याने लाखो रुपये थकबाकी असताना वसूल केली नाही. सदर संस्थाचे सभासद हे महाराष्ट्र शासनातील अधिकारी आहेत. सदर संस्थांचे सभासद गृहनिर्माण संस्था स्थापन करुन महानगरपालिकेतील यंत्रणा हाताशी धरुन व अधिकाराचा गैरवापर करुन महानगरपालिकेच्या करआकारणी रजिस्टरला सभासंदाच्या नावांची नोंद जाणूनबुजून न करता कर भरलेला नाही. आमचे संस्थेने महापालिकेच्या निदर्शनास आणूनही सदर सभासदांवर महापालिकेने कायदेशीर कारवाई केली नाही,' असे ॲड. बोरकर यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. १९९१ पासून दोन्ही संस्थांची मिळकतकर बिले, 'अध्यक्ष, वैशाखी / वैशाली गृहरचना संस्था,' अशा नावाने पाठविली जातात. मोकळा भूखंड असल्यामुळे सभासदांची नावे मिळू शकली नाहीत,' असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका श्री. डी. ए. ठुबे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका श्रीमती एम.एन. केरकेट्टा यांनी सांगितले. या संस्थाची नोंदणी आपल्याकडे आढळून येत नसल्याचे उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर यांनी दि. १२.७.२००६ रोजी कळविले. मात्र या संस्थेची नोंदणी झाली असल्याचे मौजे लोहगाव, ता. हवेली येथील तलाठ्याकडील अभिलेखातून ॲड. बोरकर यांनी लेखी प्राप्त करुन घेतले. संदर्भित सोसायटयांची एकूण जमीन १६ एकर असून १०४ सभासदांची यादी असल्याचे त्यांनी सांगितले. वैशाली संस्थेच्या बाबतीत श्री. फिलोपोझ अब्राहम आणि वैशाखी संस्थेच्या बाबतीत श्री. फिलोपोझ अब्राहम व श्री. आर. ए. वाझ यांची ७/१२ ला नोंद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी, करआकारणी व करसंकलन विभाग यांनी, तसेच महानगरपालिकेच्या एकूणच यंत्रणेने १९९१ पासून गेल्या १६ वर्षात तांत्रिक, औपचारिक कार्यवाहीपलीकडे कोणतीही कारवाई केलेली नाही, अशी माहिती निष्पन्न होते. १९९१ पासूनची सुमारे ४८ लाख रुपयांची थकबाकी असून कामगार तलाठी, लोहगाव ता. हवेली यांनी दि. २२.११.२००६ रोजी या जमीनीवर उपआयुक्त ( जनरल ), करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका यांचा आदेश व जिल्हाधिकारी, पुणे आणि तहसीलदार, हवेली यांची पत्रे या अन्वये पुणे महानगरपालिकेचा बोजा दाखल केला. कामगार तलाठी, लोहगाव, ता. हवेली जि. पुणे यांच्या सहीची व तयार तारीख १९.१२.२००६ असा उल्लेख असलेली 'हक्काचे पत्रक' प्रत आयोगाला यावेळी सादर करण्यात आली. या पत्रात नमूद केलेली ४८ लाख रुपयांची थकबाकी भरण्याचा प्रस्ताव एका बांधकाम व्यावसायिकाकडून (बिल्डर) महानगरपालिकेला गेल्या काही दिवसात प्राप्त झाला असून संबंधित गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांशी निगडीत विषय आपण हाताळू, असे या बांधकाम व्यावसायिकाने सांगितले आहे. हा प्रस्ताव स्वीकारला गेल्यास महानगरपालिकेची ४८ लाख रुपयांची थकबाकी त्यामुळे वसूल होऊ शकेल, असे महानगरपालिकेल्या उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र हा तपशील अद्याप अधिकृत झाला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारे थकबाकी भरुन घेऊन संबंधित भूखंड हस्तांतरीत करता येईल का, त्याबाबतच्या नियमांची पूर्तता झाली आहे का, याची माहिती नागरिकांना कळली पाहिजे, मूळ अर्जातील मागणीशी व निवेदनाशी संबंधित अशीच ही माहिती असल्यामुळे ती मिळाली पाहिजे, असा आग्रह ॲड. बोरकर यांनी धरला. परंतु हा विषय माहितीच्या मूळ मागणीत नाही, अनुषंगाने आलेला आहे. आयोगापुढील विचाराचा मुख्य विषय तो नाही. ॲड. बोरकर यानी माहिती मागणीच्या मूळ अर्जापासून सभासदत्वाच्या संदर्भात अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यानी आयोगापुढे केलेली विधाने वास्तव माहितीवर आधारित आहेत का, याची पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यांनी मागितलेली सभासदांची यादी, थकबाकी व ती वसुलीसाठी महानगरपालिकेने केलेली कार्यवाही आदी माहिती मिळणे त्यासाठी नितांत गरजेचे आहे. मिळकतकराच्या थकबाकीची वसुली होण्याची शक्यता हे माहितीची मागणी डावलण्यासाठी कारण ठरु शकत नाही.

अशा प्रश्नातील व्यापक जनहित लक्षात घेता या संदर्भातील संपूर्ण माहिती महानगरपालिकेकडून नागरिकांसाठी उपलब्ध झाली पाहिजे. तसेच संबंधित गृहरचना संस्थांच्या नोंदणीबाबतच्या माहितीतील विसंगतीची कारणे स्पष्ट करुन वस्तुस्थितीदर्शक निवेदन, व केवळ 'अध्यक्ष, वैशाखी / वैशाली सहकारी गृहरचना संस्था' अशा नावे १६ वर्षे नोंद ठेवून सभासदांची नावे व अन्य तपशील मिळविण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती व्यापक जनहितार्थ अपीलकर्त्याला दिली जाणे व एकुणात नागरिकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे.

सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. वैशाखी व वैशाली या सहकारी गृहरचना संस्थांच्या संदर्भातील नोंदणीबाबतची वस्तुस्थिती, १६ वर्षांत सभासदांची नावे आदि तपशील महानगरपालिकेच्या दप्तरी नसल्यास तो अपीलकर्त्याला उपलब्ध करुन न देण्यास कारणीभूत असलेली परिस्थिती, मिळकत कराच्या थकबाकीवसुलीच्या संदर्भात केलेली कार्यवाही ही माहिती दि. १५.१०.२००७ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

३. संदर्भित संस्थांच्या भूखंडाच्या संदर्भातील सभासदांची नावे, व सर्व (बांधकाम व्यावसायिकाकडून आलेला प्रस्ताव, त्याबाबतची पुढील कार्यवाही, आदी ) अद्ययावत माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १५.१०.२००७ पर्यंत अपीलकर्त्याला द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २४.९.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. शरद रामण्णा शेट्टी,
प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर,
गणराज मंगल कार्यालयाजवळ,
प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ,पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर, गणराज मंगल कार्यालयाजवळ, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ,पुणे डॉ. पी. एस. चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे श्री. व्ही. के. वाघ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन २००४ ते २००६ या वर्षी एक्सरे टेक्निशियन किती भरले, त्यांना कोठे नियुक्ती देण्यात आली, एक्सरे टेक्निशियन भरतीकरिता आलेल्या उमेदवारांची यादी, मार्क, नाव, पत्ता, पात्रतेसह माहिती. आरोग्य उपसंचालक डॉ. डोईफोडे यांचे गावचे व त्यांच्या तालुक्यातील किती उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली, भरतीसाठी किती पैसे उमेदवारांनी दिले

## विवेचन

सन २००४ ते २००६ या वर्षी पुणे आरोग्य उपसंचालक कार्यालयाने केलेल्या एक्सरे टेक्निशियनच्या भरतीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्यसेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्याकडे मागितली होती. भरतीकरिता आलेल्या उमेदवारांची यादी, नाव, पत्ता, पात्रता, गुण यासह माहिती मिळावी, तसेच आरोग्य उपसंचालक डॉ. डोईफोडे यांच्या गावच्या व त्यांच्या तालुक्यातील किती उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली, भरतीसाठी उमेदवारांनी किती पैसे दिले, अशी माहितीही त्यांनी विचारली होती. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांनी विहित मुदतीत ही माहिती दिली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती न देता अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. माहिती अपुरी मिळाल्याचे नमूद करुन श्री. शेट्टी यांनी संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे अपील केले. परंतु 'उपसंचालक, आरोग्यसेवा, पुणे हे स्वत: अपिलीय अधिकारी आहेत, आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी,' असे संचालक, आरोग्यसेवा यांनी श्री. शेट्टी यांना कळविले. परंतु डॉ. डोईफोडे यांच्याविषयीची माहिती मागितली असून तेच अपिलीय प्राधिकारी आहेत व दिलेली माहिती अपुरी व असमाधानकारक आहे, असे नमूद करुन श्री. शेट्टी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. ज्यांच्यावर आरोप करुन माहिती मागितली आहे, तेच अपिलीय प्राधिकारी आहेत हे औचित्याला धरुन नाही. आरोग्य संचालकांनी हे विचारात घेऊन अपिलाची दाखल घ्यावयास हवी होती. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांऐवजी मूळ मागणीच्या अर्जाचे उत्तरही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देणे योग्य नाही. मात्र अर्जदाराने मागितलेल्या सर्व मुद्दयांवरील माहिती देण्यात आली आहे. परंतु भरतीकरिता आलेल्या उमेदवारांची संपूर्ण यादी दिलेली नाही, ती देणे आवश्यक होते.

या भरतीत भ्रष्टाचार झाला असल्याचा दावा श्री. शेट्टी यांनी आयोगापुढील सुनावणीत केला तर, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्याचा इन्कार केला. या आरोपाला पुष्टी देणारी माहिती श्री. शेट्टी सादर करु शकले नाहीत व भ्रष्टाचार झाला आहे की नाही, हे सिध्द करणे हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही. सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता आदि तपशीलासह यादी अपीलकर्त्याला नि:शुल्क द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २०.९.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शरद रामण्णा शेट्टी,
प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर,
गणराज मंगल कार्यालयाजवळ,
प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक संचालक (हिवताप),
आरोग्य सेवा, पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.६.२००७ |

**३. उपस्थित**

**उपस्थित** श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर,
गणराज मंगल कार्यालयाजवळ, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा
(हिवताप), पुणे विभाग, पुणे डॉ. सुभाष अमृतराव मोरे

**जन माहिती अधिकारी** जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे
डॉ. सलील वसंतराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन १ जानेवारी २००५ ते ३१ मार्च २००६ फवारणी कार्यक्रमाचा तपशील, गाव निहाय, प्रत्येक गावास किती किलो व कोणती पावडर वापरली, पावडर खरेदीची तारीख, बॅच नंबर, उत्पादन व मुदत संपणेची तारीख याची माहिती. मनुष्यबळ किती वापरले त्यांचे नाव व पत्ते, स्वराज मझदा गाडीच्या लॉगबुकची छायांकित प्रत, तसेच जिल्हा हिवताप कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची नावे, पत्ते, पगार व फोन नंबर इत्यादी माहिती

## विवेचन

दि. १ जानेवारी २००५ ते ३१ मार्च २००६ या काळात केलेल्या फवारणीविषयीचा व कर्मचाऱ्यांची नावे आदी तपशील, तसेच 'स्वराज मझदा' गाडीच्या लॉगबुकाच्या छायांकित प्रती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे यांच्याकडे केली होती. माहितीचे स्वरुप विस्तृत असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. शेट्टी यांना रु. २२,६१४/- शुल्क भरण्यास कळविले. शुल्क भरल्यानंतर

४५ दिवसात माहिती पाठविली जाईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले. श्री. शेट्टी यांनी त्याविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक सचांलक आरोग्य सेवा (हिवताप ), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती किती पानांची आहे, हे उत्तरावरुन कळून येत नाही, ती ११३०७ पानांची आहे का, अशी विचारणा श्री. शेट्टी यांनी अपिलासोबतच्या निवेदनात केली. तसेच शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यास पंचेचाळीस दिवसांची मुदत अनाठायी असून माहिती देण्याची टाळाटाळ केली जात आहे, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक सचांलक आरोग्य सेवा (हिवताप ), पुणे विभाग, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर ग्राह्य ठरविले. 'वरील संदर्भान्वये माहितीच्या सर्व पानांची संख्या १८७२ असून या संदर्भात पाठविण्यात येणाऱ्या माहितीच्या छायांकित प्रती मा. सह संचालक आरोग्य सेवा (हिवह), पुणे,तसेच या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. यांना पाठविण्यासाठी एकूण ५६१६ प्रतीच्या छायांकित प्रती काढणे गरजेचे आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या तपशिलाकरिता जिल्हा हिवताप अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या पगार नोंदवहीच्या छायांकित प्रती ह्या माहितीच्या एकूण पानांपैकी ५४०० पानांच्या आहेत. व सदरची पाने ही जम्बो साईजमध्ये असल्यामुळे त्यांच्या प्रती काढणे करिता येणारा खर्च हा जास्त प्रमाणात येणार आहे. तसेच जिल्हा हिवताप कार्यालयात कामाचा अधिक भार असल्यामुळे आपल्याला देण्यात आलेली ४५ दिवसांची मुदत ही अनाठायी नाही. आपण जिल्हा हिवताप अधिकारी यांनी त्यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर माहितीकरता पैसे त्यांच्या कार्यालयात जमा करावे व माहिती प्राप्त करुन घ्यावी,' असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री. शेट्टी यांना कळविले. या मुदतीबाबत मतभेद असल्यामुळे आपण शुल्क भरले नाही, असे श्री. शेट्टी यांनी सांगितले, तर शुल्क न भरल्यामुळे माहिती दिली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. श्री. शेट्टी यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे रास्त आहे. मात्र शुल्क भरल्यापासून पंचेचाळीस दिवसांची मुदत त्यासाठी लागेल, हे म्हणणे रास्त नाही. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयात नोंदविल्याप्रमाणे सहसंचालक, आरोग्यसेवा आदींना पाठवावयाच्या प्रतींची (तीन प्रतींची ) रक्कम अर्जदाराला भरावयास सांगणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियमात बसणारे नाही. ती प्रशासकीय गरज असल्यास माहिती मागणाऱ्यावर हा बोजा लादता येणार नाही. अर्ज केल्यापासून एक वर्ष होऊन गेले असल्यामुळे आपल्याला नि:शुल्क माहिती

मिळावी, अशी मागणी श्री. शेट्टी यांनी केली. परंतु माहिती देण्यास नकार दिला नाही, तसेच मागितलेली माहिती संकलित करण्यास लागणारा अवधी, माहितीची व्याप्ती लक्षात घेता श्री. शेट्टी यांनी शुल्काबाबत त्वरित संपर्क साधला असता तर स्पष्टीकरण देता आले असते, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे डॉ. सलील वसंतराव पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मागितलेल्या माहितीचे स्वरुप, प्रमाण व मोठ्या आकाराच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यास येणारा खर्च लक्षात घेता, तसेच शुल्क भरण्याबाबत अर्जदाराने त्वरित कोणतीही कृती केलेली नाही हे लक्षात घेता माहिती निःशुल्क देण्याची मागणी मान्य करता येणार नाही. जंबो आकाराच्या प्रतीसाठी झेरॉक्स करण्यासाठी प्रत्येक प्रतीला चार रुपये खर्च येतो, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. पानांचा आकार व छायांकित प्रतींसाठी येणारा खर्च लक्षात घेता त्यास मान्यता देण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व आयोगाला सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्त्याने ७५३८/- रुपये शुल्क भरल्यानंतर सात दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहिती द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २६.९.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. शरद रामण्णा शेट्टी,
प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर, अपीलकर्ता
गणराज मंगल कार्यालयाजवळ,
प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
क्षेत्रिय अधिकारी,
औंध क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.६.२००७ |

**३. उपस्थित**

**उपस्थित** श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट क्र.१४, वीरभद्रनगर, गणराज मंगल कार्यालयाजवळ, प्रेमप्रभा, बाणेर, पुणे- ४११ ०४५

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, औंध क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विजय दहिभाते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पुणे महापालिकेच्या नवीन प्रभाग क्र.२६ मध्ये जानेवारी २००१ ते जानेवारी २००६ मध्ये केलेली विकासकामे, त्यासाठी आलेला खर्च, कामे कोणत्या ठेकेदाराकडून करुन घेतली, त्याच्या दर्जाविषयी अहवाल, विकासकामास देण्यात आलेली मुदत व मुदतीत झालेली विकास कामे,किती ठेकेदार महानगरपालिकेच्या काळ्या यादीतील आहेत, विकासकामांची पूर्ण पहाणी करुन पैसे अदा करण्यात आले आहेत का, याविषयी सविस्तर माहिती

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २६ मध्ये दि. १.१.२००१ ते दि. १.१.२००६ या कालावधीत झालेली विकासकामे, त्याचा खर्च, कामे दिलेले ठेकेदार व पूर्ण पाहणी करुन पैसे अदा करणे याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी क्षेत्रिय अधिकारी, औंध क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यांनी तो अर्ज स्वीकारला, परंतु केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागणारा हा अर्ज पुणे महानगरपालिकेच्या जन माहिती अधिका-यांकडे सादर करावयास हवा होता, असे क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्यांना कळवून हा अर्ज पुणे महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे त्यांनी पाठविला. माहिती न मिळाल्याच्या करणावरुन श्री. शेट्टी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. त्याची दखल घेतली न गेल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

क्षेत्रिय अधिकारी, औंध क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनी नवीन प्रभाग क्रमांक नकाशा व हद्द याबाबतची माहिती आपल्याकडे उपलब्ध नसल्याचे व निवडणूक निर्णय अधिकारी, पुणे महानगरपालिका यांजकडून ती मागविल्याचे श्री. शेट्टी यांना दि. १.७.२००६ रोजी कळविले. हा नकाशा निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाला असून त्यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपात असल्यामुळे ती संकलित करण्यास दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो, असे क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पुणे महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांना दि. १६.८.२००६ रोजी कळविले. मूळ अर्ज व अपील दोन्हीही योग्य अधिकाऱ्यांकडे केले नव्हते, परंतु माहिती देण्याचा प्रयत्न आपण केला असे क्षेत्रिय अधिकारी, औंध क्षेत्रिय कार्यालय श्री. विजय दहिभाते यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. प्रभाग क्र.२६ हा नव्याने निर्माण झालेला विभाग आहे, त्यामुळे त्यावेळी नकाशा तयार झाला नव्हता म्हणून देता आला नाही, तसेच फेब्रुवारी २००७ मध्ये झालेल्या महानगरपालिका निवडणुकीचे काम क्षेत्रिय कार्यालयाकडे होते. सन २००१ ते २००६ या काळात जुना वॉर्ड व प्रभाग निहाय विकास कामे झालेली असल्यामुळे, तसेच मागितलेली माहिती विविध विभागांकडून संकलित करुन द्यावयाची विस्तृत माहिती असल्यामुळे विलंब लागला असे क्षेत्रिय अधिकारी श्री. विजय दहिभाते यांनी स्पष्ट केले. मात्र अद्यापि आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे श्री. शेट्टी यांनी सांगितले. श्री. दहिभाते यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, असे दिसून येते. मूळ अर्जातील द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी त्वरित व निःशुल्क देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. द्यावयाची राहिलेली माहिती अपीलकर्त्यास त्वरित व निःशुल्क द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २६.९.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शरद रामण्णा शेट्टी,
प्लॉट क्र.१४, प्रेमप्रभा, वीरभद्रनगर, — अपीलकर्ता
गणराज मंगल कार्यालयाजवळ,
बाणेर, पुणे- ४११ ०४५

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
नगर अभियंता, — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट क्र.१४, प्रेमप्रभा, वीरभद्रनगर,गणराज मंगल कार्यालयाजवळ, बाणेर, पुणे- ४११ ०४५

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रशांत वाघमारे

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शांताराम खंडेराव थोरात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे बोपोडी येथील भाऊ पाटील रोड, काळूबाई मंदिर बोपोडी रोड किती फूट होता, आता किती फूट रोड आहे, ह्याची कारणे काय. विकास आराखड्यातील ह्या रोडच्या नकाशासह सविस्तर माहिती

## विवेचन

मौजे बोपोडी येथील भाऊ पाटील रोड, काळूबाई मंदिर रोड याची विकास आराखड्यातील नकाशासह माहिती अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी त्याला उत्तर पाठविले नाही, त्यामुळे श्री. शेट्टी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली. विकास आराखड्यातील या क्षेत्राच्या साईट प्लॅनसाठी रु. १००/- शुल्क भरण्यास त्यांनी श्री. शेट्टी यांना कळविले. काळूबाई मंदिर रोडबाबत आपल्याला माहिती न मिळाल्याचे नमूद करुन श्री. शेट्टी यांनी

राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात या बाबत 'भाऊपाटील रोड ते काळूबाई मंदिर रोड असा रस्ता विकास आराखड्यात दर्शविला नाही', असे उत्तर दिले आहे. आपल्याला भरावयास सांगितलेले शुल्क रु. १००/- घेता कामा नये, अशी मागणी श्री. शेट्टी यांनी केली. परंतु अशा नकाशासाठी पुणे महानगरपालिकने निर्धारित केलेले हे शुल्क आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले. विशेष बाबींसाठी निर्धारित केलेले शुल्क घेण्यास माहिती अधिकारांतर्गत नियमान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील अमान्य.

२. निर्धारित रु. १००/- शुल्क भरुन अपीलकर्त्याने अपेक्षित नकाशा प्राप्त करुन घ्यावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २४.९.२००७**